# चणे-फुटाणे

बा.ग. जोशी

रिया पब्लिकेशन्स्

**चणे-फुटाणे : बा. ग. जोशी**

© **बा. ग. जोशी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
ऑक्टोबर, २०११

**किंमत**
रुपये १८०/-

# मनोगत

'चणे-फुटाणे' हे माझे तिसरे पुस्तक. या पुस्तकातील सर्व किस्से 'दै.पुढारी' व 'दै.तरुण भारत' कोल्हापूरमधून वेळोवेळी प्रसिद्ध झालेले आहेत. हे पुस्तक म्हणजे त्या प्रसिद्ध झालेल्या लेखांचे संकलन आहे. या संदर्भात 'दै.पुढारी' व 'तरुण भारत' च्या संपादकांचे जेवढे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

'हसण्यासाठी जन्म आपुला' हे सूत्र पकडून मी हे पुस्तक लिहिले आहे. यामध्ये राजकीय व्यक्तींचा, सिने अभिनेत्यांचा बराचसा सहभाग आहे. इतकंच काय पण या पुस्तकात श्वान, बोकड व गाढव हे मानवाचे सच्चे मित्रसुद्धा आपली कैफियत सादर करताना दिसतील. क्रूरकर्मा वीरप्पनसुद्धा या पुस्तकात चमकला आहे. या सर्व मंडळींचे पण मला आभार मानले पाहिजेत. कारण त्यांनी मला लेखनासाठी भरपूर कच्चा माल पुरवला आहे. त्या कच्च्या मालासाठी मला अजिबात धावाधाव करावी लागली नाही. दररोजचं वर्तमानपत्र नुसतं चाळलं तरी लेखासाठी 'रेडिमेड मटेरियल' उपलब्ध होत गेलं. नंतर काही दिवसांनी असे किस्से लिहिण्याचं मला व्यसनच जडलं.

या पुस्तकाचं स्वरूप 'टाईमपास' स्वरूपाचं दिसत असलं तरी या पुस्तकात मानवी स्वभावाचे विविध नमुने दिसून येतील. हे नमुने एकत्र करून मी हे नमुनेदार पुस्तक लिहिले आहे. या माझ्या पुस्तकाला साहित्यिक खोली फारशी नाही पण खोलीत बसून एकांतात हे पुस्तक वाचल्यास सर्वांगाला गुदगुल्या झाल्याशिवाय राहणार नाहीत. साधारणपणे पुण्याहून मुंबईला जाताना डेक्कन क्वीनच्या अडीच तासाच्या प्रवासात पुस्तक वाचून संपेल अशा हिशोबाने लिहिले आहे. या पुस्तकातील सर्व घटना आणि नावे काल्पनिक आहेत.

हे पुस्तक प्रसिद्ध होत असताना पुन: एकदा दै. पुढारी व दै. तरुण भारत या संपादकद्वयांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केल्याशिवाय राहवत नाही. तसेच प्राचार्य रा.तु.भगत व त्यांचे चिरंजीवद्वय यांचे योगदान विसरता येणार नाही.

**- बा.ग.जोशी**

# 'चणे-फुटाणे खाण्यापूर्वी'

'चणे-फुटाणे' या पुस्तकाचे लेखक श्री. बा.ग.जोशी लेखकाच्या मनोगतात म्हणतात, 'हसण्यासाठी जन्म आपुला, हे सूत्र पकडून मी हे पुस्तक लिहिले आहे.' लेखकाचे मनोगत आणि पुस्तकाचे शीर्षक यांचा बराच संबंध असला तरी तो खराच तसा संबंध आहे असे मानता येणे कठीण आहे. हे पुस्तक ही दोन घटकांची करमणूक किंवा टाईमपास आहे हे म्हणणे लेखकावर, लेखनावर आणि लेखकाच्या दृष्टिकोनावर अन्याय करणारे होईल.

'साध्याही विषयात आशय कधी
मोठा किती आढळे'

असे केशवसुतांनी म्हटले आहेच. मात्र त्यासाठी दृष्टी हवी. जीवनाचे वैविध्यपूर्ण अंतरंग पाहण्याची आणि त्यातील आशय शोधण्याची एक विशेष बुद्धी असते, ती 'चणे-फुटाणे' च्या लेखकात आहे हेच खरे ! वाचकाला हसविल्यावरच त्याला 'बोध' रूपी औषधाचा डोस देता येतो हे लेखकाला माहीत आहे. म्हणूनच आपल्या मूळ हेतूविषयी काही न सांगता ते पहिल्यांदा वेगळाच हलकाफुलका-खेळीमेळीचा-हसण्याचा हेतू सांगतात. पण 'कोऽपि आंतरहेतु' त्यांच्या लेखनात आहे हे जाणकाराने ओळखले पाहिजे. या लेखनाच्या खोलात शिरल्यावर तो कळतो.

खरे तर आजच्या जीवनकलहाच्या काळात लेखकांची-त्यातून हेतूनिष्ठ लेखक-कवींची, तळमळीच्या प्रबोधनकारांची, समाजातील अस्वस्थता-ताणतणाव-विसंवाद कळणाऱ्यांची व तो अभिव्यक्त करण्यासाठी धडपडणाऱ्यांची फारच पंचाईत झाली आहे. कारण समाजात विविध वैचारिक संप्रदाय व वृत्तीप्रवृत्तींची प्रचंड निर्मितीही झाली आहे आणि त्यांचे अनेकविध चांगले-वाईट (त्यातून चांगले थोडे, वाईटच अधिक) परिणाम प्रत्यही अनुभवास येत आहेत. अनेक नव्या रोगट प्रवृत्ती दिसत आहेत. समाजजीवनाची गंगा या रोगट प्रवाहांनी कधी नव्हे इतकी प्रदूषित झाली आहे. अर्थात, 'समाज बिघडला' हे वाक्य तसे नवेही नाही आणि पूर्वी नव्हते मध्येच निर्माण झाले असेही नाही. अगदी वेदकाळापासून ही हाकाटी आपण करीतच आहोत. भूतकाळातील चित्रे लुप्त झालेली असतात, भविष्यातील दिसणे शक्यच नसते म्हणून आपण वर्तमानकाळाविषयी ओरडतो कारण वर्तमान दिसत असतो. खरे तर समाज आणि त्याचे दोष सनातनच असतात.

'चणे-फुटाणे' च्या लेखनातून समाजातील अनेक दोष लेखकाला आढळून आले आहेत आणि ते आपणाला दिसले कसे नव्हते असे आश्चर्यही वाटते. त्यामुळेच त्यांचे लेखन वाचत जावे असे वाटते. श्री. जोशी हे एक अधिकारी म्हणून मुलकी खात्यात व त्यानंतर म्युनिसिपालिटीत कार्यरत राहिले. महानगरपालिकांचा कारभार किती ओंगळ-बोंगळ आहे हे त्यांचे 'चणे-फुटाणे' वाचल्याशिवाय कळणार नाही. नगरसेवकासंबंधीचा त्यांचा शेरा 'महापालिकेत हत्ती' या खमंग आठवणीतून वाचण्यास मिळतो. साठ हत्ती (पक्षी नगरसेवक) मुळात असताना एकसष्टावा (खराखुरा) हत्ती हवाच कशाला ? या प्रश्नाने हे प्रकरण संपते. येथे हसण्यापेक्षा चिंतनच केले पाहिजे.

लेखक बा. ग. जोशी यांनी वर्तमापत्रांच्या वाचनातून आपण लेखन केले असे म्हटले आहे. एखादा शहाणा माणूस रद्दीतूनही सोने कसे निर्माण करतो याचे हे उत्तम उदाहरण आहे. वर्तमानपत्रातील बातम्यांमध्ये सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि व्यावहारिक कथानकांचे भाग प्रसिद्ध होत असतात. या भागांचे आकलन व्यवस्थित झाले की आपल्या लेखनासाठी योग्य असा कच्चा माल सापडला, असे लेखकाला वाटत असावे. हा कच्चा माल थोड्या कल्पनाशक्तीचा वापर करून, त्याचा पक्का माल तयार करून श्री. जोशी वाचकांना पुरवितात. हा पदार्थ वाचकांना खमंग लागतोच. त्यामुळे श्री. जोशी यांचे लेखन केवळ मल्लीनाथी या स्वरूपाचे न राहता ते प्रबोधन, उद्‌बोधन, उपदेश या प्रकारात समाविष्ट होते. पुराणवाङ्मयापासून ते आधुनिक पाकक्रियांपर्यंतचे बरेच ज्ञान त्यांच्या संग्रही असल्याने त्यांचे लेखन माणसाला सामान्य ज्ञान देण्याच्या दृष्टीनेही चांगलेच उपयुक्त आहे.

'चणे-फुटाणे' या पुस्तकातील लेखनाची वर्गवारी करणे अवघड नाही. महानगरपालिका, राज्य सरकार, केंद्र सरकार आणि आंतरराष्ट्रीय राजकारण एवढ्या दीर्घ कक्षेत शिरून त्यांनी लेखन केले आहे. त्यांच्या लेखनाला त्या त्या काळांचे संदर्भ आहेत पण त्या संदर्भातून डोकावणाऱ्या मानवी मनाच्या छटा, वृत्ती-प्रवृत्ती या काल-स्थल निरपेक्ष आहेत. त्यामुळे त्यांचे लेखन मनुष्यस्वभावाचे वैविध्यपूर्ण दर्शन घडविते. समाजकारण आणि राजकारण यावर विनोदी भाष्य करण्यात त्यांचा हातखंडाच आहे. स्वत:च्या भूमिकेविषयी 'लाऊडस्पीकर' मधून त्यांनी जो विचार मांडला आहे, तो महत्त्वाचा आहे. 'चणे-फुटाणे'च्या लेखनामागील हेतू त्या विचारातून दिसतो. ते म्हणतात, 'होय ! मी संतांचा लाऊडस्पीकर होणार ! गावोगावी हिंडून प्रवचनं देणार, व्याख्यानं देणार, संस्कार केंद्र काढणार, बस्स मरेपर्यंत एवढा एकच उद्योग करणार.' त्यांचे लेखन संतांच्या साहित्यासारखे परखड, स्पष्टवादी आहे. ते कोणाची स्तुती करू इच्छित नाहीत. खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे म्हणणे हे त्यांचे व्रत आहे. त्यामुळेच त्यांचे 'चणे-फुटाणे' उद्‌बोधन, बोध यांचा सत्त्वयुक्त आहारही आहे असे म्हणावे लागते.

श्री. जोशी हे निरोगी मनाने लेखन करतात. पंतप्रधान हे पद आजकाल किती पोकळ झालं आहे याविषयी योग्य शब्दांत, संयमानं त्यांनी लिहिलं आहे. 'रा.लो.आ. सरकारला जनता कंटाळली आहे. मुख्य म्हणजे रा. लो.आ. सरकारचे प्रमुख असलेले पंतप्रधान यांचं मानसिक संतुलन बिघडलं आहे. पंतप्रधानांच्या मेंदूला योग्य प्रकारे रक्तपुरवठा होत नाही हे त्याचं कारण' (मुदतपूर्व पावसाळा) असं ते सहज लिहून जातात. वास्तविक वाजपेयींकडून राष्ट्राच्या खूपच अपेक्षा होत्या पण त्या सर्व फोल झाल्यावर शहाणा माणूस निराश का होणार नाही ? रा. लो. आ. ची खिचडी किती बेचव असावी हे सांगावे श्री. जोशी यांनीच ! पंतप्रधान वाजपेयींच्या केविलवाण्या भूमिकेबद्दल त्यांनी लिहिलेला लेख उद्‌बोधक आहे. 'बुशदादा, मला वाचवा' असं सतत विनविणारे वाजपेयी पंतप्रधानपदाला न शोभणारे आहेत. 'पाकिस्तानचे अतिरेकी भारताची अब्रू लुटतात तेव्हा तुम्ही काय करीत होता ?' या प्रश्नाचं उत्तर वाजपेयी देतात, 'मी बाजूच्या देवघरात सोवळं नेसून पूजा करीत होतो.' जोशी यांच्या या लालित्यपूर्ण राजकीय कल्पनाचित्रातील वास्तविकता बरेच काही सांगून जाणारी आहे. वाजपेयींचे 'काश्मिरी पुलावा' मध्ये जे व्यक्तित्त्व दिसतं, तेच अधिक वास्तव आहे असेही वाटतं. ते एक नंबरचे खवैय्या आहेत. मग बाकीचं सारं. आपल्या पंतप्रधानांना 'शांततेचं पारितोषिक' मिळालंच पाहिजे कारण, पाकिस्तान, बांग्लादेश, चीन यांच्याकडून सतत मार खाऊनही त्यांना उदार अंत:करणाने (?) क्षमा केली आहे त्यांनीच ! अशा मार खाऊनही शांत राहणाऱ्या महान नेत्याला शांतता पारितोषिक नको द्यायला ? लेखकाने 'कडबोळे सरकारचे नेते' म्हणून त्यांचा यथोचित सन्मान (?) केला आहेच.

अमेरिकेच्या छातीवर नाचणारा धर्मांध लादेन हाही जोशी यांच्या लेखनात वारंवार आला आहे. लादेन हा अतिरेक्यांचा शहेनशहा आहे. बुश एवढा सामर्थ्यसंपन्न प्रेसिडेंट असूनही लादेन त्यांना न सापडणं हा त्यांच्या सामर्थ्याचा आणि मुत्सद्देगिरीचा केवढा अपमान आहे. 'लादेन की खोज में', 'दिसला गं बाई दिसला', 'बंगला कोसळला', 'बुद्धिबळाचा डाव' अशा लेखनातून लादेन न सापडल्यानं आणि त्याच्या कारवाईनं त्रस्त झालेले प्रेसिडेंट जॉर्ज बुश दिसून येतात. अमेरिकेने डोंगर

पोखरला पण लादेन मात्र सापडला नाही तो नाहीच. अमेरिकेच्या या नामुष्कीच्या इतिहासाची नोंद लेखकाने मुद्दामच घेतली आहे.

महाराष्ट्रातील मुख्यमंत्रीपदासाठी चाललेली साठमारी आणि कोल्हापुरातील महापौरपदासाठी उमेदवारांच्या पक्षी चाललेली धडपड आणि किंगमेकरपक्षी चाललेली निवडानिवड यांच्याबद्दल लेखकाने अनेक लेख लिहिले आहेत. मुख्यमंत्री काय आणि महापौर काय, शेवटी ही सर्व प्यादीच आहेत आणि त्यांना नाचविणारे कुणी वेगळेच आहेत. ही लोकशाहीच्या महान तत्त्वांची विटंबना या सर्व लेखांतून दृग्गोचर होते. वाईट वाटतं ते आपल्या अपरिपक्व लोकशाहीचं. भारतात शहाणी माणसं संख्येनं काही कमी नाहीत पण वरील पदांसाठी कौल आवश्यक असतो, कोणा मॅडमचा किंवा आप्पांचा ! हे लेख वाचून भारतीय जनमानस किती षंढ आहे, या विचारापर्यंत आपण येतो. 'मला नामदार करा', 'वेगळं व्हायचंय मला', 'उद्याचा महापौर', 'कौन बनेगा पी. एम्. ?' अशा लेखातून आपल्या देशाच्या स्थितीचं लेखकाने केलेलं अचूक निदान चिंतनयोग्य वाटतं.

लेखक श्री. बा.ग. जोशी यांना शुद्ध विनोदाचं अंग आहे, याची जाणीव त्यांचे काही लेख वाचल्यावर होते. 'रेडिमेड भाषणे' या लेखात त्यांनी ज्या वर्कशॉपची कल्पना मांडली आहे तो लेख आणखी विस्ताराने लिहिला गेला तर श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या पठडीत बसेल असे नक्की वाटते. 'मेस्त्रीची कैफियत' हा लेख विस्ताराने लिहिला जावा इतका सुंदर आहे. त्यातूनही मेस्त्रीने आपली जी तक्रार आपल्या अनुभवज्ञानाधारे लिहिली आहे, ती नक्कीच चोखंदळ वाचकाला आवडेल अशी आहे. 'डाव पत्त्यातला आणि राजकारणातला' हा लेखही विनोदी आहे. 'काही नव्या टी.व्ही. सिरियल्स' मार्मिक आहे. 'सिंहासन बत्तिशी' विनोदाबरोबरच लेखकांच्या राजकीय व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास स्पष्ट करणारा आहे. 'राजकीय कॅलेंडर' मधून भारतातील पक्षांचे स्वभावधर्म विनोदी अंगाने लिहिले आहेत. त्यांचाही विस्तार केल्यास वाचक त्याचे स्वागत करतील. पु.ल. देशपांडे यांच्या 'नारायणा' ला वाचक विसरू शकणार नाहीत पण लेखकाने त्याच्याच चालीवर पु.लं. ची क्षमा मागून 'अत्याधुनिक नारायण' उभा केला आहे. (लेखकाचा राजकीय क्षेत्रातील विनोद पकडण्याचा सराव लक्षात आल्यामुळे हा नारायण 'तो' तर नव्हे असे क्षणभर वाटते.) 'हसरं कोल्हापूर' मध्ये भेटलेले बॅ. भोसले हे जात्याच विनोदी होते यात शंकाच वाटत नाही. लेखकाने त्यांची दिलेली आठवण आमच्या नेत्यांचे अंतरंगदर्शन घडविते.

'मुख्यमंत्रीपदी निवड झाल्याचे जाहीर झाले त्यावेळी पत्रकारांनी बॅ. भोसले साहेबांना गाठले व विचारले, 'आपण मंत्रिमंडळ बनविण्यासाठी आपल्या सहकाऱ्यांची मीटिंग केव्हा घेणार आहात ?' त्यावर बॅ. भोसले हसून म्हणाले, 'त्यासाठी मीटिंगची गरज नाही. अहो, जनावर मरून पडल्यावर गिधाडांना निमंत्रण द्यावं लागत नाही.'

'मुख्यमंत्रीपदाचा काटेरी मुकुट' हा लेख सद्यकालीन अनेक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांचे वस्त्रहरण करणारा आहे. 'आम्ही टी.व्ही. पाहतो' हा लेख आपणाला सावध करण्यासाठी लिहिला आहे. टी.व्ही. चे संस्कार किती खराब असतात हे कळण्यासाठी तो लेख मुळातूनच वाचला पाहिजे.

श्री. बा. ग. जोशी यांनी मराठी साहित्यातील एका वेगळ्या वाटेने प्रवास सुरू केला आहे. त्यांनी वर्तमानपत्रातील बातम्यांचा आपल्या लेखनासाठी उपयोग केला आहे. मी अशा प्रकारच्या बातम्यांवर आधारित 'वृत्तवेधक अभंग' किंवा 'वृत्तवेधक गझल' लिहिल्या आहेत. हे साहित्य कल्पना किंवा विचार यावर आधारलेल्या साहित्यापेक्षा अधिक विश्वासार्ह असते असा माझा दावा आहे. म्हणूनच असा साहित्यप्रकार वेगळ्या वाटेचा प्रवासी आहे असे मला वाटते. कारण मराठी साहित्यात असा प्रयत्न यापूर्वी फारसा झालेला नाही. तो विपुलपणे होणे आवश्यक आहे. कारण, त्यातून सामाजिक प्रवृत्तींचा मागोवा घेता येतो. त्यांच्या वाटेवरून जाणाऱ्यांना आणि वाचकांनाही बरेच लाभ होतील. लेखकाने आपली वाटचाल अशीच पुढे चालू ठेवावी. त्यांच्याकडून वाचकांच्या खूपच अपेक्षा आहेत हे नमूद केले की त्यातच सर्व आले असे मी मानतो.

**– प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**

# अनुक्रमणिका


१. छोटीसी लव्ह स्टोरी .................................... १३
२. माधुरीचं डोहाळेजेवण .................................... १७
३. स्टेफीचा बाळंतविडा .................................... २२
४. स्वप्नातला करोडपती .................................... २६
५. आम्ही टी.व्ही. पाहतो .................................... ३०
६. पहिलीपासून राजकारण .................................... ३४
७. अत्याधुनिक नारायण .................................... ३८
८. पुन्हा एकदा वीरप्पन .................................... ४२
९. 'ही तर वीरप्पनची पावले !' .................................... ४५
१०. प्रेमाचा त्रिकोण .................................... ४९
११. 'घोटाळ्याचे विश्व' .................................... ५२
१२. बोकडदादा .................................... ५५
१३. श्वानपुराण .................................... ५९
१४. 'अरे गाढवा' .................................... ६३
१५. कृषिपंडित शीलाजी .................................... ६६
१६. काश्मिरी पुलाव .................................... ७०
१७. सद्याचे हाऊसफुल्ल नाट्यप्रयोग .................................... ७४
१८. लाऊडस्पीकर .................................... ७७
१९. रेडिमेड भाषणे .................................... ८०
२०. मेस्त्रीची कैफियत .................................... ८३
२१. मला नामदार करा .................................... ८५
२२. स्वयंवर झाले सत्तेचे .................................... ८९